# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा

(स्थानिक गुन्हे शाखा, सातारा)

दुरध्वनी क्रमांक- ०२१६२-२३३९२३ वेबसाईट www.satarapolice.gov.in

मेल आय डी - pilcb.satara@mahapolice.gov.in


**प्रेसनोट** दिनांक १४/०२/२०२६

**(स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांची कारवाई.)**

## ( पोलीस अभिलेखावरील ५ आरोपींच्याकडून ३ देशी बनावटीचे पिस्टल, ५ जिवंत काडतुस, १ मारुती सुझूकी इर्टीगा, ६ मोबाईल हॅन्डसेट असा एकुण १२,६७,५००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त.)

श्री.तुषार दोशी पोलीस अधीक्षक, सातारा व श्रीमती डॉ.वैशाली कडुकर अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी सातारा जिल्हयामध्ये अवैध अग्निशस्त्रे बाळगणारे, विक्री करणारे, निर्मिती करणारे इसमांची माहिती प्राप्त करुन त्यांचेकडून अवैध जप्त करण्याच्या सुचना पोलीस निरीक्षक अरुण देवकर, स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांना दिल्या. त्याप्रमाणे त्यांनी सहायक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे व रोहित फार्णे यांचे अधिपत्याखाली एक पथक तयार करुन त्यांना कारवाई करण्याच्या सुचना दिल्या.

दिनांक १४/०२/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांना त्यांचे विश्वसनीय गोपनिय बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, वाई येथील काही इसम एका मारुती सुझूकी कंपनीची इर्टीगा क्रमांक MH-12-NE-9210 मधून लोणंद बसस्थानक परिसरात देशी बनावटीची पिस्टल व जिवंत काडतुसे यांची विक्री करण्याकरीता येणार आहेत, अशी खात्रीशिर माहिती मिळाल्याने त्यांनी सहायक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे व रोहित फार्णे यांचे पथकास नमुद इसमांना ताब्यात घेवून कारवाई करण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे पथकाने लोणंद बसस्थानकाचे परिसरात सापळा लावून प्राप्त माहितीमधील १) निखील शिवाजी मोरे, वय २८ वर्षे, रा.१८५ गंगापुरी वाई, २) आयुष चंद्रकांत अडसुळ, वय २० वर्षे, रा.रविवारपेठ वाई, ३) यश बबन चव्हाण, वय २१ वर्षे, रा.बावधन ता.वाई जि.सातारा, ४) नितीन दत्ता वाडकर, वय २८ वर्षे, रा.बावधन ता.वाई जि.सातारा, ५) सनी काशिनाथ भोसले, वय ३४ वर्षे, रा.खानापुर ता.वाई जि.सातारा या इसमांना ताब्यात घेवून त्यांचे कब्जातून **३ देशी बनावटीचे पिस्टल, ५ जिवंत काडतुस, १ मारुती सुझूकी इर्टीगा कार, ६ मोबाईल हॅन्डसेट असा एकूण १२,६७,५००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त** करुन त्यांचे विरुध्द लोणंद पोलीस ठाणे गु.र.नं. ७३/२०२६ भारतीय शस्त्र अधिनियम (सुधारीत) २०१९ चे कलम ३, ७, २५ अन्वये नोंद केला आहे.

श्री. तुषार दोशी पोलीस अधीक्षक सातारा, श्रीमती डॉ.वैशाली कडुकर अपर पोलीस अधीक्षक सातारा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अरुण देवकर स्थानिक गुन्हे शाखा सातारा, सहायक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे, रोहित फार्णे, पोलीस उपनिरीक्षक विश्वास शिंगाडे, परितोष दातीर, पोलीस अंमलदार आतिश घाडगे, संतोष सपकाळ, विजय कांबळे, संजय शिर्के, शरद बेबले, लैलेश फडतरे, लक्ष्मण जगधने, प्रविण फडतरे, स्वप्नील शिंदे, अरुण पाटील, गणेश कापरे, अविनाश चव्हाण, अमित सपकाळ, स्वप्नील कुंभार, अमित माने, ओंकार यादव, मोहन पवार, विशाल पवार, पृथ्वीराज जाधव, रोहित निकम, सचिन ससाणे, रविराज वर्णेकर यांनी सहभाग घेतला असुन कारवाईत सहभागी अधिकारी व अंमलदार यांचे श्री.तुषार दोशी पोलीस अधीक्षक सातारा, श्रीमती डॉ.वैशाली कडुकर अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी अभिनंदन केले आहे.

---

(मा.पोलीस अधीक्षक, सातारा यांचे मान्यतेने)